PRESS NOTE (Legal) 2018 (LEGAL)

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## नगररचना विभाग
**स्वामी विवेकानंद भवन, आर.बी.के. स्कूलच्या बाजूला, कनाकिया, मिरारोड (पु.)**

जा.क्र. - मनपा/नर/३३५७/२०१८-१९

दिनांक - १८/०८/२०१८

प्रति,
सिस्टीम मॅनेजर
नागरी सुविधा केंद्र,
मिरा भाईंदर महानगरपालिका.

संगणक विभाग
आवक क्र: ७९५
दिनांक : २१/८/२०१८

विषय - जाहिर सुचना प्रसिद्धी करणेबाबत.

संदर्भ :- मा. महासभा, ठराव क्र.३१ प्रकरण क्र.३० दि.१८/०७/२०१८.

विषयांकित प्रकरणी संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते कि, मिरा भाईंदर शहराच्या मंजूर विकास योजनामध्ये फेरबदल करणेबाबत मा. महासभेने संदर्भिय ठरावान्वये मंजूरी दिलेली असून त्याप्रमाणे अधिसूचना प्रसिद्ध करणे आवश्यक आहे.

यास्तव सदरची मराठी व इंग्रजी भाषेतील अधिसूचना मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात यावी.

(श्रीकांत देशमुख)
सहाय्यक संचालक, नगररचना
मिरा भाईंदर महानगरपालिका

सोबत :- जाहीर सुचनेची प्रत

प्रत - माहितीस्तव
स्विय सहाय्यक
मा. आयुक्त सो. दालन, मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)
## ता. व जि. ठाणे

## // अधिसूचना //

(महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वये फेरबदल)

ज्या अर्थी, मिरा भाईंदर शहराची विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 31(1) नुसार (यापुढे "उक्त अधिनियम" असे संबोधण्यात येत आहे) शासन अधिसूचना क्र. टीपीएस-1296/847/सीआर-162/96/युडी-12, दि.14/05/97 अन्वये मंजूर करण्यात आलेली असून ती अनुक्रमे दि.15/07/97 पासून अंमलात आलेली आहे.

आणि ज्या अर्थी, वगळलेल्या भागाची विकास योजना "उक्त अधिनियमाचे" कलम 31(1) नुसार शासन अधिसूचना क्र. टीपीएस-1298/नपा/सीआर-89/98/युडी-12, दि.25/08/2000 अन्वये मंजुर झाली असून दि.15/10/2000 पासून अंमलात आलेली आहे.

आणि ज्या अर्थी, मिरा भाईंदर महानगरपालिकेने सर्व साधारण सभा ठराव क्र. ठराव क्र. 31, प्रकरण क्र. 30, दि.18/07/2018 अन्वये उक्त अधिनियमाचे कलम 37 नुसार मंजूर विकास योजनेत खालीलप्रमाणे फेरबदल करण्याचे ठरविले आहे.

मौजे राई येथील उत्तरेकडील आ.क्र. 49 (माध्यमिक शाळा विस्तार) लगतच्या 30.00 मी. रुंद विकास योजना रस्त्यापासून दक्षिणेकडील आ.क्र. 50 (खेळाचे मैदान) लगतच्या 18.00 मी. रुंद विकास योजना रस्त्यापर्यंत 12.00 मी. रुंद विकास योजना रस्ता (विद्यमान विकसीत नाल्यासह) मंजूर विकास योजनेमध्ये दर्शविणे. (सोबतच्या भाग नकाशाप्रमाणे)

आणि त्याअर्थी, उपरोक्त नमुद फेरबदलाबाबत हरकती किंवा सूचना द्यावयाच्या असल्यास त्यांनी हरकती / सूचना लेखी स्वरुपात सदरची अधिसूचना शासन राजपत्रात प्रसिध्द झालेल्या दिनांकापासून 30 दिवसाच्या मुदतीपर्यंत सादर करव्यात, म्हणजे सदर फेरबदलाच्या प्रस्तावास अंतिम स्वरुप देण्यापूर्वी उक्त सूचना / हरकतींचा विचार करता येवू शकेल.

महानगरपालिकेने प्रस्तावित केलेला फेरबदलाचा नकाशा जनतेच्या अवलोकनासाठी व माहितीसाठी, महानगरपालिका, मुख्य कार्यालयात कार्यालयीन वेळेत ठेवण्यात आला आहे.

(बालाजी खतगांवकर)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# MIRA BHAYANDAR MUNICIPAL CORPORATION
## MAIN BRANCH, BHAYANDAR (W)

LATE INDIRA GANDHI BHAWAN, CHHATRAPATI SHIVAJI MAHARAJ MARG, BHAYANDAR (W), TQ. & DIST. THANE 401 101

## NOTIFICATION

(UNDER SECTION 37 OF MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT - 1966)

Whereas, the Development Plan of Mira Bhayandar Municipal Corporation has been sanctioned by the Govt. in Urban Development Department Under Section 31(1) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Hereinafter referred to as the "Said Act") vide Notification No. TPS-1296/9847/CR-162/96, UD-12, Dt.14/05/1997 and came into force from the Dt.15/07/1997.

And whereas excluded portion has been sanctioned U/s. 31(1) of "Said Act" by the Govt. in U.D.D. vide Notification No. TPS/1298/94/CR-89/98, UD-12, Dt.25/08/2000 and came into force from Dt. 15/10/2000.

And whereas, Mira Bhainder Municipal Corporation has decided vide General Body Resolution No. 31, Chapter No. 30, dt.18/07/2018 to modify sanctioned development plan U/s. 37 of "Said Act" as described below.

A new 12.00 mt. wide D.P. road is proposed from 30.00 mt. D.P. road of North side of Reservation No. 49 (Extension of High School) to 18.00 mt. D.P. road of South side near Reservation No. 50 (Play Ground) including existing Development Nalla (As shown in part plan of D.P. herewith) at Village Rai in the D.P. of Mira Bhainder Municipal Corporation.

And therefore, due to above said modification, those who wants to submit their suggestions and objections within one month from publications of Notification in Government gazette, may submit in writing to the Mira Bhainder Municipal Corporation which may be considered before finalizing the proposal.

The plan showing proposed modification by the Municipal Corporation is kept open in the Office of Mira Bhayandar Municipal Corporation during Official hours for the inspection of the public.

(Balaji Khatgaonkar)
Commissioner
Mira Bhayandar Municipal Corporation